।। श्री ।।

आपली भूमी.. आपला आवाज...

वीरभूमी

संपादक : महादेव दळे

*** सुविचार ***

सुखापेक्षा समाधान महत्त्वाचे आहे,
कारण सुख थोडा काळ
टिकतं पण समाधान आयुष्यभर.

अहिल्यानगर ■ मंगळवार, दि. २४ नोव्हेंबर २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक १२९ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145 www.veerbhuminews.com

वीरभूमी फोडणी

अरुण महादेव वाळुंज । अहिल्यानगर, मो. ९६२३८६८३७२

निवडणुका

दुष्काळात निवडणुका
सुरु झाली जत्रा
मताला हजाराचा भाव
सगळे शोधतात बकरा

काम काय पत्ता नाही
बोला खर्च करणार किती?
लोकशाहीचा झेंडा नेमका
देतोय कुणाच्या हाती?

SPOT NEWS

रॅपिडोविरोधात रिक्षाचालकांचा राज्यव्यापी एल्गार

● **मुंबई** – राज्यातील रिक्षा आणि टॅक्सी चालकांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी सोमवारी (२३ नोव्हेंबर) राज्यव्यापी बंद पुकारण्यात आला होता. बेकायदेशीर बाइक टॅक्सी सेवा आणि रॅपिडोच्या माध्यमातून सुरू असलेल्या प्रवासी वाहतुकीला विरोध करण्यासाठी रिक्षा संघटना आक्रमक झाल्या होत्या. ऑटोरिक्षा पंचायत समितीने दिलेल्या या बंदच्या हाकेला महाराष्ट्र नवनिर्माण वाहतूक सेनेसह विविध राजकीय पक्षांच्या रिक्षा वाहतूक संघटनांनी पाठिंबा दिला होता. मुंबई, पुणे, ठाणे, कोल्हापूर, नाशिकसह राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये या आंदोलनाचे पडसाद उमटले. मात्र, राज्यव्यापी बंदची हाक देण्यात आली असली, तरी प्रत्यक्षात अनेक शहरांमध्ये रिक्षा वाहतुकीवर संमिश्र परिणाम दिसून आले. त्यामुळे कामानिमित्त घराबाहेर पडलेल्या चाकरमान्यांना आणि प्रवाशांना या बंदचा फटका बसला. गेल्या काही दिवसांपासून राज्यात रॅपिडोच्या बाइक टॅक्सी सेवेला विरोध वाढत आहे. दुचाकींच्या माध्यमातून प्रवासी वाहतूक केली जात असल्याने पारंपरिक रिक्षाचालकांच्या व्यवसायावर परिणाम होत असल्याचा दावा रिक्षा संघटनांनी केला आहे.

ऊसदरासाठी उद्या निर्णायक बैठक

। जिल्हाधिकाऱ्यांचे कारखानदारांना कायदेशीर पत्र, मंगळवारपासून ऊसतोड बंद ठेवण्याचे निर्देश
। ४ हजार रुपये दर न मानल्यास शुक्रवारी रास्तारोको, रेल्वे रोकोचा राजू शेट्टी यांचा इशारा



● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

जिल्ह्यातील ऊसदराच्या प्रश्नावर जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी साखर कारखानदारांच्या अध्यक्षांना कायदेशीर पत्र पाठवून बुधवारी (दि. २६) आयोजित बैठकीस उपस्थित राहण्याचे बंधन घातले आहे. तसेच बैठकीपर्यंत मंगळवारी सकाळपासून ऊसतोड बंद ठेवण्याचे निर्देश पत्राद्वारे देण्यात आले आहेत. बुधवारी होणाऱ्या बैठकीत साखर कारखानदारांनी ४ हजार रुपये प्रतिटन ऊसदर मान्य न केल्यास शुक्रवारी (दि. २८) जिल्हाभर रास्तारोको आणि रेल्वे रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते खासदार राजू शेट्टी यांनी सोमवारी दिला.

जिल्ह्यातील साखर कारखाने सुरू होऊन सुमारे दीड महिन्याचा कालावधी लोटला आहे. शेतकरी संघटनांनी पहिली उचल ३ हजार ७०० रुपये, त्यानंतर १०० रुपये वाढ आणि साखरेच्या दरातील तफावतीपोटी २०० रुपये प्रतिटन, असा एकूण ४ हजार रुपये प्रतिटन ऊसदर मिळावा, अशी मागणी केली आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी जिल्ह्यातील साखर कारखानदार आणि शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींच्या तीन बैठका घेतल्या; मात्र अद्याप तोडगा निघालेला नाही. दुसरीकडे शेतकरी संघटनांनी आंदोलनाची भूमिका घेतली आहे.

या पार्श्वभूमीवर सोमवारी शेतकरी संघटनांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा मोर्चा काढण्यात आला. दिवसभर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्यात आले. वाजतगाजत, झेंडे फडकावत आणि मागण्यांचे फलक हातात घेऊन मोठ्या संख्येने शेतकरी मोर्चात सहभागी झाले होते.

या आंदोलनात माजी मंत्री महादेव जानकर, खासदार नीलेश लंके, आमदार विठ्ठलराव लंघे, आमदार अमोल खताळ, जिल्हा परिषदेच्या माजी सदस्य हर्षदा काकडे, माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे तसेच जिल्ह्यातील विविध शेतकरी संघटनांचे पदाधिकारी सहभागी झाले होते.

जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्यासमवेत खासदार नीलेश लंके, शेतकरी संघटनांचे पदाधिकारी प्रकाश बलवाडकर, अमरसिंह कदम, मयूर बोर्डे, जितेंद्र भोसले, रवींद्र मोरे, रावसाहेब लवांडे, सुरेश टाके, अनिल इंगळे, प्रकाश देठे आणि अभिजीत पोटे यांनी चर्चा केली.

ज्या साखर कारखान्यांनी ऊसदर जाहीर केले आहेत, ते अत्यंत कमी आहेत. साखरेचे दर वाढलेले असताना शेतकऱ्यांना वाढीव ऊसदर मिळावा. पालकमंत्री विखे पाटील आणि जिल्हाधिकाऱ्यांनी आयोजित केलेल्या बैठकांना साखर कारखान्यांचे अध्यक्ष व कार्यकारी संचालक प्रतिसाद देत नसल्याने सोलापूर जिल्हाधिकाऱ्यांनी काढलेल्या पत्राप्रमाणे भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये त्यांना बैठकीला उपस्थित राहणे बंधनकारक करावे. बैठक होईपर्यंत ऊसतोड बंद ठेवावी, अशी मागणी शेतकरी प्रतिनिधींनी केली.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी साखर कारखान्यांचे अध्यक्ष आणि शेतकरी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांमध्ये मध्यस्थी करून बैठक आयोजित करण्यासह त्यानुसार पत्र काढण्याचे मान्य केले. यासंदर्भातील पत्र प्रादेशिक साखर सहसंचालक गणेश पुरी आणि निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गीते यांनी खासदार राजू शेट्टी यांच्याकडे सुपूर्त केले. त्यानंतर ठिय्या आंदोलन मागे घेण्यात आले.

यावेळी बोलताना खासदार राजू शेट्टी यांनी बुधवारी होणाऱ्या बैठकीत साखर कारखानदारांनी ४ हजार रुपये प्रतिटन ऊसदर मान्य न केल्यास शुक्रवारपासून साखर कारखान्यांकडे जाणारे सर्व रस्ते रोखण्यात येतील. तसेच महामार्गावर रास्तारोको आणि रेल्वे रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा दिला.

जिल्हाधिकाऱ्यांच्या पत्रानुसार साखर कारखान्यांनी मंगळवारी सकाळी १० वाजल्यापासून ऊसतोड बंद ठेवावी. तोडलेल्या उसाची वाहतूक करताना कारखान्यांची वाहने रस्त्यावर आढळल्यास आणि या वाहनांचे काही बरेवाईट झाल्यास अथवा नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित साखर कारखानदारांवर राहील, असा इशाराही खासदार राजू शेट्टी यांनी दिला.

गोकुळ प्रकरणातील युक्तिवादासाठी रोहतगींना ८० लाख रुपये

मानधन देण्यावरून सतेज पाटील, राजू शेट्टी यांची सरकारवर टीका

● **मुंबई । वीरभूमी–**

कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ (गोकुळ) मधील चार शासन नियुक्त संचालकांच्या नियुक्तीला न्यायालयात समर्थन देण्यासाठी ज्येष्ठ विधिज्ञ तथा देशाचे माजी महान्यायवादी ॲड. मुकुल रोहतगी यांना ८० लाख रुपये मानधन देण्याचा निर्णय सहकार विभागाने घेतला आहे. या निर्णयावरून विरोधकांनी राज्य सरकारवर टीका केली असून, जनतेच्या पैशांची उधळपट्टी होत असल्याचा आरोप केला आहे.

गोकुळ दूध संघावर शासनाने चार सदस्यांची नियुक्ती केली होती. या नियुक्तीला विरोध करत समविचारी आघाडीच्या वतीने उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचमध्ये याचिका दाखल करण्यात आली होती. शासन नियुक्त सदस्यांच्या नियुक्तीला स्थगिती देण्याची मागणी या याचिकेत करण्यात आली होती. सरकारची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. मुकुल रोहतगी यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यांच्या युक्तिवादासाठी सहकार विभागाने ८० लाख रुपये मानधन मंजूर केले आहे. या खर्चावरून विरोधकांनी सरकारला लक्ष्य केले आहे.

गोकुळच्या निवडणुकीत सतेज पाटील यांच्या नेतृत्वाखालील समविचारी आघाडीला १३, तर महायुतीला १२ जागा मिळाल्या होत्या. गोकुळच्या उपनियमांनुसार अध्यक्षपदासाठी १४ सदस्यांचा पाठिंबा आवश्यक असल्याने अध्यक्ष निवडीचा पेच निर्माण झाला होता. या पेचातून मार्ग काढण्यासाठी राज्य सरकारने चार शासन नियुक्त सदस्यांची नियुक्ती केली. त्यामुळे सत्तेचे पारडे महायुतीच्या बाजूने झुकल्याचे चित्र निर्माण झाले.

या नियुक्त्यांना विरोध करत समविचारी आघाडीने उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचमध्ये याचिका दाखल केली होती. नियुक्त सदस्यांच्या नियुक्तीला स्थगिती देण्याची मागणी याचिकेद्वारे करण्यात आली. या प्रकरणाची सुनावणी दूरदृश्य प्रणालीद्वारे छत्रपती संभाजीनगर खंडपीठात झाली. सुनावणीदरम्यान समविचारी आघाडीच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. अभिषेक सिंघवी यांनी, तर राज्य सरकारच्या वतीने ॲड. मुकुल रोहतगी यांनी युक्तिवाद केला.

या युक्तिवादासाठी ॲड. रोहतगी यांना ८० लाख रुपये मानधन देण्यात येणार आहे. या रकमेतून १० टक्के प्राप्तिकर वजा करून ७२ लाख रुपये मानधन अदा केले जाणार असल्याची माहिती देण्यात आली. सहकार विभागाने नियमानुसार ॲड. मुकुल रोहतगी यांचे मानधन अदा केले असल्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी स्पष्ट केले. गोकुळमध्ये सत्ता स्थापन करण्यासाठी साम, दाम, दंड आणि कपटाचा वापर करणाऱ्या महायुती सरकारचा हा कारभार असल्याची टीका आमदार सतेज पाटील यांनी केली. सत्ताधाऱ्यांच्या क्षुद्र राजकारणासाठी जनतेच्या पैशांची उधळपट्टी सुरू असल्याचा आरोप माजी खासदार राजू शेट्टी यांनी केला.

अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेचे
चेअरमन तथा माजी खासदार



मा.श्री.सुजयदादा विखे पाटील

आणि

श्रीगोंदा तालुक्याचे मा. आमदार

मा.श्री.राहुलदादा जगताप पाटील





आपणांस वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!









* शुभेच्छुक *
सभापती, उपसभापती, संचालक, शेतकरी, व्यापारी, हमाल व मापाडी
कृषी उत्पन्न बाजार समिती श्रीगोंदा

सौ. मनिषा योगेश मगर (उपसभापती)

श्री. अतुल लोखंडे (सभापती)

विजय उंडे, वीरभूमी, श्रीगोंदा ता. प्रतिनिधी, मो. ९४२३७१३०७९

SPOT NEWS

युवकांची संघटनात्मक ताकद हीच शिवसेनेची खरी शक्ती : राम रेपाळे

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

युवकांची संघटनात्मक ताकद हीच शिवसेनेची खरी शक्ती असून, युवकांच्या सहभागातून पक्षाची विचारधारा समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने अहिल्यानगर जिल्ह्यात शिवसेना व युवासेनेची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्याचे काम उत्तम प्रकारे सुरु असल्याची भावना शिवसेनेचे राज्य सचिव तथा अहिल्यानगर जिल्हा संपर्कप्रमुख राम रेपाळे यांनी व्यक्त केली. शहरातील शासकीय विश्रामगृह येथे युवा सेनेच्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीपत्र वितरण कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी रेपाळे बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मृदा व जलसंधारण मंत्री संजय राठोड हे देखील उपस्थित होते. युवासेना जिल्हाप्रमुख योगेश गलांडे तसेच शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल शिंदे व बाबुशेठ टायरवाले यांच्या मार्गदर्शनाखाली या नियुक्त्या करण्यात आल्या. यावेळी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी शहरप्रमुख संभाजी कदम, माजी नगरसेवक दिलीप सातपुते, संदेश कार्ले, नवनाथ कातोरे, अभिषेक भोसले, ओंकार सातपुते, शंकर शेळके, वैष्णव गलांडे, दीपक परभाणे, योगेश गाडीलकर, सागर गायकवाड, सागर सूर्यवंशी, मनोज क्षीरसागर, अक्षय कोटे, आदित्य वांडेकर, संकेत साठे, सचिन झिटे, विकास पठारे, प्रमोद पठारे, सूरज रासकर, वैभव वाघ, सुनील मुसमाडे, विलास भोसले, वैभव कारखिले, ओम गोडसे, सोनू उबाळे, बद्रीनाथ गीते, शुभम खेडकर, रोहन पवार, अक्षय खाडे, रोहित पवार, अरबाज खान, सौरभ इंगळे आदींसह शिवसेना व युवासेनेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढे बोलताना रेपाळे म्हणाले की, शिवसेनेने राज्याच्या राजकारणात आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. युवकांमध्ये प्रचंड ऊर्जा, जिद्द आणि समाजासाठी काहीतरी करण्याची क्षमता आहे. या ऊर्जेला योग्य दिशा देण्याचे काम युवासेनेच्या माध्यमातून केले जात आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यातील युवक शिवसेनेच्या विचारांशी जोडले जात असून, त्यांच्या माध्यमातून संघटना अधिक सक्षम होत असल्याचे त्यांनी सांगितले. या नियुक्त्यांमध्ये नगर युवासेना उपतालुका प्रमुखपदी सचिन भिमराज खेसे (हमीदपूर) व विशाल शिवाजी गिते (नवनागापूर) यांची नियुक्ती करण्यात आली. तसेच नगर युवासेना तालुकाप्रमुखपदी शिवाजी मधुकर सोनवणे (कामरगाव), तर पारनेर युवासेना तालुकाप्रमुखपदी गणेश नारायण पठारे (मावळवाडी) यांची नियुक्ती करण्यात आली. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी आपापल्या कार्यक्षेत्रात युवकांचे संघटन करून शिवसेनेचे विचार व ध्येयधोरणे तळागाळापर्यंत पोहोचवावीत, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली. युवासेना जिल्हाप्रमुख योगेश गलांडे म्हणाले की, अहिल्यानगर जिल्ह्यात युवासेनेचे संघटन अधिक व्यापक आणि मजबूत करण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. युवकांना संघटनेत योग्य संधी आणि जबाबदारी दिल्यास ते निश्चितच चांगले काम करू शकतात. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी आपल्या परिसरातील युवकांना एकत्र आणून त्यांच्या समस्या जाणून ते शिवसेनेच्या माध्यमातून सोडविण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले.

खासगीकरणाच्या धोरणाविरोधात पाटबंधारे कर्मचाऱ्यांची जोरदार निदर्शने

● **अहिल्यानगर । वीरभूमी –**

राज्य शासनाच्या जलसंपदा (पाटबंधारे) विभागाने जाहीर केलेल्या सुधारित आकृतिबंधामुळे राज्यातील सुमारे १६ हजार ५०० कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्यांवर टांगती तलवार निर्माण झाली आहे. महत्त्वाची शासकीय पदे मृत संवर्ग (डेड कॅडर) म्हणून घोषित करून आऊटसोर्सिंगच्या माध्यमातून बाह्य यंत्रणेकडून कर्मचारी उपलब्ध करून घेण्याचे धोरण राबविले जात असल्याने शासकीय सेवांच्या खासगीकरणाचा मार्ग मोकळा होत असल्याचा आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे. या धोरणाच्या निषेधार्थ सोमवारी (दि. २३ नोव्हेंबर) महापालिकेसमोरील पाटबंधारे विभागाच्या कार्यालयात कर्मचाऱ्यांनी जोरदार निदर्शने केली. शासनाने लादलेला बेकायदेशीर सुधारित आकृतिबंध तातडीने रद्द करावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. या आंदोलनात राज्य सरकारी मध्यवर्ती कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष सुभाष तळेकर, सचिव रावसाहेब निमसे, भाऊसाहेब शिंदे, वैशाली बोडखे, किशोर गांगर्डे, विजय तोडमल, प्रीती पंडित, पल्लवी सोनवणे, मृदुला भोर, अश्विनी कचरे, सोमनाथ पोटे, सोनाली जगधने यांच्यासह पाटबंधारे विभागातील कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. जलसंपदा विभागाने दि. १९ नोव्हेंबर २०२६ रोजी आस्थापनेचा सुधारित आकृतिबंध जाहीर केला आहे. यामध्ये खात्यांतर्गत कार्यरत असलेली कनिष्ठ लिपिक, टंकलेखक, संगणक चालक, वाहनचालक, अनुरेखक, सहायक आरेखक, परिचर, भांडारपाल, सहायक भांडारपाल आदी महत्त्वाची पदे मृत संवर्ग म्हणून घोषित करण्यात आली आहेत.

पाण्यासाठी महिलांचा पारनेर नगरपंचायतीवर हंडा मोर्चा

मुख्याधिकाऱ्यांनी मुख्यालयात राहून नागरिकांच्या समस्या सोडवाव्यात । भ्रष्टाचार आणि विकासकामांतील अनियमिततेचे आरोप, चार दिवस पारनेर बंदचा इशारा

● **पारनेर । वीरभूमी–**



पारनेर शहरातील अनियमित पाणीपुरवठा, दूषित पाणी आणि बंद पथदिव्यांच्या समस्यांमुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. या समस्यांकडे नगरपंचायत प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने महिलांचा हंडा मोर्चा काढण्यात आला. भैरवनाथ मंदिर परिसरातून सुरू झालेल्या या मोर्चात महिलांसह नागरिक आणि पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत नगरपंचायत प्रशासन व सत्ताधाऱ्यांविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. 'मुबलक पाणी द्या', 'नगरपंचायत प्रशासनाचा निषेध असो', अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

शिवाजी रोड पेठ मार्गे निघालेला हा मोर्चा नगरपंचायत कार्यालयासमोर पोहोचल्यानंतर त्याचे रूपांतर निषेध सभेत झाले. यावेळी नगरसेवक अशोक चेडे यांनी शहराला किमान तीन ते चार दिवसांनी तरी स्वच्छ पाणीपुरवठा करण्यात यावा, अशी मागणी केली. नगरसेवक युवराज पठारे यांनी सुपा-पारनेर रस्त्यावरील धुळीचा प्रश्न उपस्थित केला. संबंधितांनी टक्केवारी घेतल्यामुळे रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असून, कामात अनियमितता असल्याचा आरोप त्यांनी केला.

ग्रामस्थ सुभाष औटी यांनी मुख्याधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीवर तीव्र नाराजी व्यक्त केली. जनतेच्या प्रश्नांसाठी अधिकारी नागरिकांसमोर येण्यास तयार नसतील, तर सामान्य नागरिकांनी न्याय कोणाकडे मागायचा, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. सर्वपक्षीय नेत्यांनी राजकारण बाजूला ठेवून पारनेरचा पाणीप्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी एकत्र यावे, असे आवाहनही त्यांनी केले. सामाजिक कार्यकर्ते शंकर नगरे यांनी नगरपंचायत प्रशासनाच्या कारभारावर गंभीर प्रश्न उपस्थित केले. नागरिकांना पिण्यासाठी पाणी मिळत नसताना सिमेंट रस्त्यांच्या कामांसाठी मात्र मोठ्या प्रमाणात पाणी उपलब्ध होत असल्याची विसंगती त्यांनी निदर्शनास आणून दिली. शहरातील विकासकामांसाठी निधी उपलब्ध होत असला, तरी कामांचे अंदाजपत्रक, दर्जा आणि खर्च यामध्ये पारदर्शकता नसल्याचा आरोप त्यांनी केला. विकासकामांमध्ये सबकंत्राटदारांचा सुळसुळाट असून, चार ठिकाणी पाहणी केली असता दर्जेदार काम आढळले नसल्याचेही त्यांनी सांगितले.

अधिकारी आणि कामे देणाऱ्यांमधील कथित टक्केवारीच्या व्यवहारामुळे सामान्य नागरिकांवर अन्याय होत असल्याचा आरोपही त्यांनी केला. दुष्काळी परिस्थिती असतानाही मुख्याधिकारी मुख्यालयात वास्तव्यास राहत नसल्याचा मुद्दा उपस्थित करत, त्यांनी मुख्याधिकाऱ्यांनी मुख्यालयात राहून नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष समजून घ्याव्यात, अशी मागणी केली. तसेच सुपा एमआयडीसीमधून पारनेरला होणाऱ्या पाणीपुरवठ्याच्या पाइपलाइनची राजपथकडून तोडफोड झाल्यानंतरही गुन्हा दाखल करण्यात आला नसल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. पाणीप्रश्न तातडीने मार्गी लावा, अन्यथा चार दिवस पारनेर बंद आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही शंकर नगरे यांनी दिला.

यामुळे नगरपंचायत प्रशासन आता या प्रश्नांवर कोणती भूमिका घेते, याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे. या मोर्चात नगरसेवक अशोक चेडे, युवराज पठारे, शंकर नगरे, सुनीता सोबले, सुषमा रावडे, सहदेव ताराळ, कांतिलाल ठाणगे, कविता औटी, अपर्णा खामकर, करण औटी, कल्याण थोरात, सुभाष औटी, ज्ञानेश्वर औटी, विठ्ठल कावरे, शकुंतला ठाणगे, शिवाजी जाधव, नियाज राजे, भाऊ औटी यांच्यासह महिला, नागरिक आणि विविध पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

इंगळे वस्तीमध्ये वाकलेला विद्युत खांब अन् मीटर डीपी धोकादायक अवस्थेत

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

रेल्वे स्टेशन परिसरातील इंगळे वस्ती येथे गेल्या अनेक दिवसांपासून महावितरणाचा विद्युत खांब वाकलेल्या अवस्थेत असून, मीटरची डीपीदेखील खाली पडलेल्या स्थितीत आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. विशेषतः या भागात महिला, लहान मुले आणि नागरिकांची सतत वर्दळ असते. अशा परिस्थितीत एखादी दुर्घटना घडल्यास त्याला जबाबदार कोण, असा संतप्त सवाल स्थानिक नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

या गंभीर समस्येबाबत परिसरातील नागरिकांनी नगरसेविका पौर्णिमा गव्हाळे व माजी नगरसेवक विजय गव्हाळे यांच्याकडे तक्रार केली होती. नागरिकांच्या तक्रारीची दखल घेत नगरसेविका पौर्णिमा गव्हाळे व माजी नगरसेवक विजय गव्हाळे यांनी महावितरणच्या वायरमनसह संबंधित अधिकाऱ्यांना या धोकादायक परिस्थितीची माहिती देऊन तातडीने विद्युत खांब आणि मीटर डीपीची दुरुस्ती करण्याच्या सूचना केल्या आहेत.

मात्र, अनेक दिवस उलटूनही महावितरणचे अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. वाकलेला विद्युत खांब आणि खाली पडलेली मीटर डीपी यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. पावसाळा असो किंवा वाऱ्याचा जोर, अशा धोकादायक विद्युत यंत्रणेमुळे मोठी दुर्घटना घडण्याची भीती नागरिकांना सतावत आहे. नागरिकांनी वारंवार तक्रार करूनही महावितरण प्रशासनाला जाग येत नसेल, तर एखादी जीवितहानी झाल्यानंतरच अधिकारी व कर्मचाऱ्यांना जाग येणार का? असा संतप्त प्रश्न उपस्थित होत आहे.

मवेशी येथे आदिवासी क्रीडा स्पर्धांचे आयोजन; आदिवासी खेळाडूंना करिअरची सुवर्णसंधी

● **शिर्डी । वीरभूमी–**

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, राजूर ता.अकोले, यांच्या अंतर्गत येणाऱ्या शासकीय व अनुदानित आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांसाठी 'प्रकल्प स्तरीय क्रीडा स्पर्धा-२०२६' चे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धा दि. २६ नोव्हेंबर ते २८ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत शैक्षणिक संकुल मवेशी ता. अकोले येथे होणार असल्याची माहिती प्रकल्प अधिकारी श्रीमती देवकन्या बोकडे यांनी दिली .

प्रकल्प कार्यालयांतर्गत केळीरुम्हणवाडी, मवेशी, अकलापूर आणि केळीकोतूळ येथे केंद्रस्तर क्रीडा स्पर्धा यशस्वीरित्या संपन्न झाल्या. यामधून २१ शासकीय आणि १८ अनुदानित आश्रमशाळांतील ५१० मुले व ५८४ मुली अशा एकूण १,०९४ गुणवंत खेळाडूंची प्रकल्प स्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. या सर्व खेळाडूंना आश्रमशाळेतून स्पर्धेच्या ठिकाणी ने-आण करण्यासाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) २५ बसेसची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे.

या तीन दिवसीय स्पर्धेत सांघिक आणि वैयक्तिक क्रीडा प्रकारांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, हँडबॉल, रिले, लांब उडी, उंच उडी, गोळाफेक, भालाफेक आणि विविध थलेटिक्स प्रकारांत खेळाडू आपले कौशल्य प्रदर्शित करतील.

स्पर्धा सुरळीत व यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी प्रकल्प स्तरावर विविध समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. यामध्ये मुख्य क्रीडा समिती, स्वागत व व्यासपीठ समिती, सांस्कृतिक व बक्षीस वितरण समिती, मुले व मुलींसाठी स्वतंत्र भोजन व निवास समिती, आरोग्य समिती, मैदान व्यवस्थापन, वाहतूक आणि तक्रार निवारण आदी समित्यांचा समावेश आहे. प्रकल्प कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी, सर्व आश्रमशाळांचे मुख्याध्यापक, अधीक्षक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी स्पर्धेच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेत आहेत.

शिक्षक हा समाज परिवर्तनाचा शिल्पकार

पोषण आहार अधिक्षक रामनाथ कराड । पाथर्डीत वरिष्ठ वेतन व निवड श्रेणी प्रशिक्षणाचा उत्साहात समारोप

● **पाथर्डी । वीरभूमी–**



शिक्षकांच्या सेवाविषयक ज्ञानात वृद्धी, व्यावसायिक क्षमता विकास आणि शैक्षणिक गुणवत्तेला चालना देण्याच्या उद्देशाने आयोजित तालुकास्तरीय वरिष्ठ वेतन श्रेणी व निवड श्रेणी प्रशिक्षणाचा दहा दिवसीय कार्यक्रम श्री तिलोक जैन विद्यालय, पाथर्डी येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. तालुकास्तरीय प्रशिक्षण मध्ये २१० प्राथमिक, माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षक व १६ सुलभक यांनी सहभाग नोंदविला. दिनांक १३ ते २२ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत आयोजित प्रशिक्षणाचा समारोप पंचायत समितीचे शालेय पोषण आहार अधिक्षक रामनाथ कराड यांच्या अध्यक्षतेखाली तर प्राचार्य अजय भंडारी, विषय तज्ज्ञ भास्कर बारगजे, अजिनाथ खेडकर, केंद्र प्रमुख बंडू नागरगोजे, सविता कुटे, नागनाथ हलकंबे, भारत गाडेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

या दहा दिवसांच्या प्रशिक्षणात शिक्षकांना वरिष्ठ वेतन श्रेणी व निवड श्रेणीसंदर्भातील नियम, शासन निर्णय, सेवाशर्ती, शिक्षकांची कर्तव्ये, शैक्षणिक जबाबदाऱ्या तसेच विविध प्रशासकीय व शैक्षणिक बाबींवर मार्गदर्शन करण्यात आले. तज्ज्ञ मार्गदर्शकांच्या व्याख्यानांमुळे शिक्षकांच्या ज्ञानात भर पडली, तर चर्चासत्रे व प्रशिक्षणातील सहभागातून अनुभवांची देवाणघेवाण घडून आली.

अध्यक्षस्थानावरून बोलताना रामनाथ कराड म्हणाले की, शिक्षकांना मार्गदर्शन करताना, प्रशिक्षण हे केवळ प्रमाणपत्र मिळविण्याचे साधन नसून स्वतःच्या ज्ञानात भर घालून अध्यापन अधिक प्रभावी करण्याची संधी आहे. शिक्षकांनी प्रशिक्षणातून मिळालेले ज्ञान प्रत्यक्ष शैक्षणिक कार्यात उतरवून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील राहावे. शिक्षक सक्षम, ज्ञानसमृद्ध व कर्तव्यदक्ष झाल्यास शैक्षणिक गुणवत्ता निश्चितच उंचावेल, प्राचार्य अजय भंडारी यांनी प्रशिक्षणाच्या यशस्वी आयोजनाबद्दल समाधान व्यक्त करत प्रशिक्षणार्थी शिक्षकांना शुभेच्छा दिल्या. दहा दिवसांच्या प्रशिक्षणातून शिक्षकांना नवीन ज्ञान, सकारात्मक दृष्टिकोन आणि कामकाजातील अधिक कार्यक्षमता मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

प्रशिक्षणाचा समारोप उत्साहपूर्ण वातावरणात झाला. या प्रसंगी सुलभक प्रा माधव लाड, प्रशिक्षणार्थी अर्जुन शिरसाट, सुरेश खेडकर, संतोष अकोलकर, कवी कैलास दौंड, शिवाजी ढाकणे, सुभाष खेडकर यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुनिल खेडकर यांनी केले तर सूत्रसंचलन आरिफ बेग यांनी केले तर डॉ. उद्धव घोषिर यांनी आभार मानले. प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी प्रा. संतोष घोगरे, राजेश साबळे, डॉ. धनगर, रामदास दहिफळे, प्रशांत शेळके, सुनील कटारिया व सर्व सुलभक यांनी परिश्रम घेतले.

सहकाराचा तेजोमय सूर्य
डॉ. सुजयदादा विखे पाटील



भारतीय जनता पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष व अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष युवकांचे प्रेरणास्थान व आमचे मार्गदर्शक डॉ. सुजयदादा विखे पाटील यांना वाढदिवस तथा अभिष्टचिंतन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !!

विश्वास, विकास आणि सहकाराची ही वाट,
शेतकऱ्यांच्या प्रगतीची उजाडली नवी पहाट.
युवकांची ऊर्जा अन् अनुभवाची साथ,
डॉ.सुजयदादांच्या नेतृत्वाने उंचावेल
अहिल्यानगरचा थाट!

सहकाराची पंढरी अन् नवे नेतृत्व

अहिल्यानगर जिल्हा म्हणजे सहकार चळवळीची जन्मभूमी आणि कर्मभूमी. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांनी रोवलेले सहकाराचे हे रोपटे आज एका विशाल वटवृक्षात रूपांतरित झाले आहे. या समृद्ध सहकाराच्या वारशाला आधुनिकतेची आणि गतिमानतेची जोड देण्यासाठी, अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या (ADCC Bank) अध्यक्षपदी युवा नेते डॉ. सुजय राधाकृष्ण विखे पाटील यांची बिनविरोध निवड झाली ही खुप अभिमानास्पद बाब असून जिल्ह्याच्या सहकारात एक नवोपक्रम व नवचैतन्य निर्माण करणारी ठरेल असा विश्वास वाटतो.

युवकांचे प्रेरणास्थान आणि सर्वसामान्यांचे आशास्थान

डॉ.सुजय विखे पाटील हे आज केवळ एक राजकीय नाव राहिलेले नसून, ते जिल्ह्यातील लाखो तरुणांचे प्रेरणास्थान आणि सर्वसामान्य जनतेचे आशास्थान बनले आहेत. वैद्यकीय क्षेत्रातील उच्च शिक्षण, आधुनिक तंत्रज्ञानाची जाण आणि प्रश्नांची तळागाळात जाऊन सोडवणूक करण्याची हातोटी ही त्यांच्या नेतृत्वाची खास वैशिष्ट्ये आहेत. सर्वसामान्य माणसाच्या सुख-दुःखाशी समरस होणारा आणि त्यांच्या विकासासाठी अहोरात्र झटणारा एक उमदा चेहरा म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते.

नेतृत्वाचे दैदिप्यमान पैलू
असणारं व्यक्तीमत्व... सुजयदादा

नेतृत्व म्हणजे संघटनेच्या ध्येयपूर्तीसाठी विविध व्यक्तींच्या क्रिया-प्रक्रियांचे संचालन, मार्गदर्शन, नियंत्रण व समन्वय करणे होय. हे सर्व पैलु दादांच्या नेतृत्वात ओतप्रोत भरलेले आहेत.

वीरभूमी
संतोष देविदास कोकणे
एम. ए. बी. एड. राज्यशास्त्र
निळवंडे धरण, ता. अकोले

समाजातील उच्च- निचतेला मुळापासून नष्ट करून अखंड जनसेवेचा वसा हाती घेतलेल्या खासदार साहेबांचे मौलीक विचार मनामध्ये जतन करून अहोरात्र समाजासाठी योगदान देण्याचे, कार्य कर्तृत्वातून समाजाची सेवा करण्याचे अखंड व्रत जोपासण्याचे काम सुजयदादा अविरतपणे करत आहेत. एखाद्या गोष्टीचा सखोलपणे सर्वंकष अभ्यास करून त्याच्या होणाऱ्या परिणामांची गुण दोषसह कारणमिमांसा करून घेतले जाणारे प्रत्येक निर्णय हे जनतेच्या हितार्थ वैयक्तीक तसेच सार्वजनिक दृष्ट्या महत्वपूर्ण कसे ठरतील याचा पदोपदी विचार मनात घेऊन राजकारणात पाऊल ठेवणाऱ्या दादांनी अल्पावधीतच आपल्या कर्तुत्वाचा ठसा जनमानसाच्या मनावर उमटविलेला आहे. आम्हालाही दादांच्या मार्गदर्शनाखाली काम करताना नेहमी नवनविन उपक्रमांच्या माध्यमातून सेवा करण्याची संधी मिळाली.

शेतकरी आणि सहकारी
संस्थांचा भक्कम आधारवड

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असते. जिल्ह्यातील कष्टकरी शेतकरी, दूध उत्पादक, लहान-मोठे व्यावसायिक आणि विविध कार्यकारी सहकारी संस्थांचे भवितव्य या बँकेच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असते. डॉ. सुजयदादांच्या रूपाने या बँकेला एक दूरदृष्टी असलेला आणि निर्णायक क्षमता असलेला चेअरमन लाभला आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली :

बळीराजाचे सक्षमीकरण : शेतकऱ्यांना वेळेवर, सुलभ आणि पारदर्शक पीककर्ज उपलब्ध होऊन शेतीपूरक व्यवसायांना मोठी चालना मिळेल.

सहकारी संस्थांचे बळकटीकरण: गावागावातील विविध कार्यकारी सोसायट्या आणि सहकारी संस्था अधिक सक्षम व डिजिटल होतील.

सर्वसामान्यांचा विश्वास : आधुनिक बँकिंग सुविधा ग्रामीण भागातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवून बँकेचा नावलौकिक राज्यात अव्वल ठरेल.

नव उपक्रमशीलतेतून नाविन्याचा शोध : डॉ. सुजयदादा विखे पाटील हे उच्चविद्याविभूषित असून ते बँकेमध्ये नवनवीन बदलांसह पारदर्शकता, अचूकता व विविध नव नवीन प्रभावी योजनांची अंमलबजावणी करून शेतकरी व सर्वसामान्य जनतेबरोबरच सहकारी संस्थांच्या बळकटीकरणाला भर देतील असा आशावाद वाटतो.

सहकाराच्या पंढरीत जन्म घेतलेल्या डॉ. सुजय दादा विखे पाटील यांना सहकाराचा तीन पिढ्यांचा वारसा असून सहकाराचे बाळकडू त्यांना लहानपणापासून मिळाले आहे. त्यामुळे ते आपल्या बुद्धीचातुर्याचा व आंतरिक कौशल्याचा यथायोग्य उपयोग बँकेच्या हितार्थ करतील!

सहकार क्षेत्रातील राजकीय मतभेद बाजूला सारून केवळ विकासाचा ध्यास घेतलेल्या डॉ. सुजयदादांनी आपल्या कुशल संघटन कौशल्याने सर्वांना सोबत घेतले आहे. त्यांच्या या निवडीमुळे जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रात नवचैतन्य निर्माण झाले असून, सर्वसामान्य जनतेच्या आणि शेतकऱ्यांच्या अपेक्षा उंचावल्या आहेत.

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या चेअरमन पदाची ही महत्त्वपूर्ण धुरा सांभाळताना आपल्या हातून सहकाराचा हा रथ यशाच्या सर्वोच्च शिखरावर पोहोचावा, हीच सदिच्छा !

दादा आप जियो हजारो साल साल के दिन हो पचास हजार !
आयुष्याच्या या पायरीवर तुमच्या नव्या जगातील नव्या स्वप्नांना बहर येऊ दे..
तुमच्या इच्छा, तुमच्या आकांक्षा उंच उंच भरारी घेऊ दे..
मनात आमच्या एकच इच्छा आपणांस उदंड आयुष्य लाभू दे..
सन्मा. दादा पुन:श्च आपणांस वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा व भावी यशस्वी वाटचालीस लाख-लाख शुभेच्छा!

SPOT NEWS

डॉ. भांडकोळी यांच्या मार्गदर्शनाखाली अकोले येथे बुधवारी भव्य रक्तदान शिबिर

● अकोले । वीरभूमी–

डॉ. भांडकोळी यांच्या मार्गदर्शनाखाली हरिश्चंद्र मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर अकोले व अर्पण ब्लड बँक, संगमनेर–अकोले यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन बुधवार दि. २५ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत करण्यात आलेले आहे, तरी जास्तीत जास्त युवकांनी, रक्तदात्यांनी रक्तदान करून सहकार्य करावे असे आवाहन आयोजकांमार्फत करण्यात आले. रक्तदान हे श्रेष्ठ दान, रक्तदान म्हणजे जीवन दान.. तर चला, करूया रक्तदान आणि वाचूया कोणाचे तरी प्राण..! या दृष्टीने डॉ.भांडकोळी यांच्या मार्गदर्शनाखाली सदर रक्तदान शिबिर हे दि.२५ नोव्हेंबर रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत हरिश्चंद्र मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर अकोले येथे आयोजित करण्यात आलेले आहे. आयोजक हरिश्चंद्र मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर अकोले यांच्या वतीने रक्तदान शिबिरात रक्तदान करण्यासाठी नाव नोंदणी सुरू आहे तरी आपले नाव नोंदण्यासाठी डॉ.भांडकोळी यांच्याशी ९२२६५२६०१६ या मोबा.नंबर वर संपर्क करावा असे आवाहन केले.

भाजपने आधी सत्तेतील निर्णयांतून संविधानाचा सन्मान दाखवावा

काँग्रेस युवा नेते मयूर पाटोळे यांचा सवाल

● अहिल्यानगर । वीरभूमी–



अहिल्यानगर शहरात भाजपच्या वतीने काढण्यात आलेल्या 'लोकशाही वाचवा– अराजकता हटवा' मोर्चावर अहिल्यानगर काँग्रेसचे युवा नेते मयूर पाटोळे यांनी जोरदार टीका केली आहे. सत्तेत बसून संविधान बचावाचा मोर्चा काढण्यापेक्षा सत्तेतील निर्णय आणि कृतीतून संविधानिक मूल्यांची अंमलबजावणी करा, असा सवाल त्यांनी भाजपला उपस्थित केला. सत्तेत बसून संविधान बचावाचा मोर्चा काढण्यापेक्षा आधी आपल्या सत्तेच्या कृतीत संविधान दिसू द्या. त्यानंतर रस्त्यावर उतरून संविधान वाचवण्याची भाषा करा, अशा शब्दांत पाटोळे यांनी भाजपच्या भूमिकेवर निशाणा साधला. संविधान हे कोणत्याही एका राजकीय पक्षाची मालमत्ता नसून देशातील प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार आणि लोकशाहीचा आत्मा आहे. संविधानाचे संरक्षण करण्याची जबाबदारी केवळ विरोधी पक्षाची नसून केंद्र आणि राज्यातील सत्ताधाऱ्यांचीही तितकीच आहे, असे पाटोळे म्हणाले. राहुल गांधी हे सातत्याने संविधान, सामाजिक न्याय, समता आणि लोकशाही संस्थांच्या संरक्षणाचे मुद्दे उपस्थित करत आहेत. विरोधी पक्षनेता म्हणून सरकारला प्रश्न विचारणे आणि जनतेच्या हक्कांसाठी आवाज उठवणे हा त्यांचा लोकशाहीतील अधिकार आहे. त्यामुळे भाजपने संविधान आणि लोकशाहीच्या नावाने मोर्चा काढण्यापूर्वी विरोधी पक्षांचा आवाज, नागरिकांचे अभिव्यक्तिस्वातंत्र्य आणि संविधानिक संस्थांचा सन्मान या मुद्द्यांवर आत्मपरीक्षण करावे, असेही त्यांनी स्पष्ट केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेले संविधान हे केवळ पुस्तक किंवा राजकीय घोषणांचा विषय नाही. संविधानातील समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय ही मूल्ये प्रत्यक्षात प्रत्येक नागरिकाच्या जीवनात उतरली पाहिजेत. केवळ मोर्चे आणि घोषणांमधून संविधानाचा जयघोष करण्यापेक्षा सत्तेतील निर्णयांतून त्याचा सन्मान सिद्ध करणे आवश्यक आहे, असे मत काँग्रेस युवा नेते मयूर पाटोळे यांनी व्यक्त केले.

'ज्ञानेश्वर'चे कार्यकारी संचालक अनिल शेवाळे यांना मातृशोक

● भेंडा । वीरभूमी–



मालेगाव येथील गं. भा. विजया पंडितराव शेवाळे (वय ८५ वर्षे) यांचे रविवार दि.२२ नोव्हेंबर रोजी निधन झाले. मालेगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे मागे दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. भेंडा येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक अनिल शेवाळे व मालेगाव येथील नामांकित डॉ. सुनील शेवाळे यांच्या त्या मातोश्री होत.

काका कोयटे यांच्या संकल्पनेतून

पुण्यात रंगला कोपरगावकरांच्या स्नेहाचा अनोखा सोहळा

● कोपरगाव । वीरभूमी–



गाव बदलते, माणसे बदलतात, काळ पुढे सरकतो; मात्र गावाशी जोडलेल्या आठवणी आणि माणसांमधील जिव्हाळा कधीच कमी होत नाही. याच भावनेचा प्रत्यय 'जावे आठवणींच्या गावा!' या आगळ्यावेगळ्या स्नेहसोहळ्यात आला. कोपरगावच्या जुन्या आठवणी, गमतीजमती, अनुभव आणि गावाशी जोडलेल्या भावनिक नात्यांना उजाळा देणारा हा सोहळा पुण्यातील घरकुल लॉन्समध्ये उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. यावेळी कोपरगावच्या जडणघडणीत मोलाचे योगदान देणारे शेखर मुंदडा आणि कैलास (बापू) वाणी यांना 'कोपरगाव भूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

यावेळी स्व.रामविलासजी मुंदडा आणि स्व. बाबूलालजी वाणी यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कोपरगावकरांच्या वतीने कार्यक्रमाच्या सह निमंत्रक व स्वागताध्यक्ष सौ. ऐश्वर्याताई सातभाई, तर पुणेकरांच्या वतीने राजेंद्र धोर्डे यांनी स्वागतपर मनोगत व्यक्त केले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमातील विशेष आकर्षण ठरलेला 'कोपरगावच्या आठवणी, किस्से आणि अनुभव' हा उपक्रम अत्यंत रंगतदार झाला. या उपक्रमासाठी तब्बल ४० कोपरगावकरांनी आपले अनुभव कथन करण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्यातून लकी ड्रॉ पद्धतीने निवडलेल्या १० जणांना प्रत्येकी चार मिनिटे देण्यात आली. सुधीर मनसाळ, पद्माताई पगार, रमेश उर्फ नंदू कुलकर्णी, उमा रायते, चंद्रकांत गवांदे, संकेत श्रीकांत कोयटे, अनिता कुदळे, मच्छिंद्र टेके, नारायण क्षीरसागर आणि सुरेश गोरे यांनी आपल्या आठवणी व अनुभवांना उजाळा दिला. जुन्या काळातील प्रसंग, मैत्रीचे किस्से आणि कोपरगावच्या बदलत्या स्वरूपाचे अनुभव यामुळे उपस्थितांना जुन्या आठवणींची सफर घडली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्यातील अग्रगण्य समता पतसंस्थेचे चेअरमन व कार्यक्रमाचे निमंत्रक ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे यांनी केले. गावाशी असलेले भावनिक नाते, कोपरगावची सामाजिक व सांस्कृतिक जडणघडण आणि गावाच्या विकासात योगदान देणाऱ्या व्यक्तींचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले.

प्रसंगी महाराष्ट्र प्रदेश भाजपचे चिटणीस व एनबीटीचे विश्वस्त राजेश पांडे, विधानपरिषदेचे सदस्य आमदार विवेक कोल्हे, कोपरगावचे नगराध्यक्ष पराग संधान, पिंपरी चिंचवड माजी महापौर श्रीमती अनिता फरांदे, श्रीमती दीप्ती चौधरी, माजी उपमहापौर दीपक मानकर, समता पतसंस्थेचे व्हा.चेअरमन अरविंद पटेल, संचालक संदीप कोयटे, कचरू मोकळ, जनरल मॅनेजर सचिन भट्टड यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

यावेळी राजेश पांडे, आमदार विवेक कोल्हे, नगराध्यक्ष पराग संधान, माजी महापौर अनिता फरांदे, दिप्ती चौधरी, माजी उपमहापौर दीपक मानकर यांनी मनोगते व्यक्त केली. मनोगतातून त्यांनी कोपरगावच्या विकासाचा प्रवास, सहकार क्षेत्राचे योगदान, सामाजिक एकोपा आणि गावाशी असलेले नाते जपण्याचे महत्त्व विशद केले. गावाच्या प्रगतीसाठी सर्वांनी एकत्रितपणे योगदान देण्याचे आवाहनही मान्यवरांनी केले.

कोपरगावच्या सामाजिक व विविध क्षेत्रांतील योगदानाची दखल घेत शेखर मुंदडा आणि कैलास (बापू) वाणी यांना मान्यवरांच्या हस्ते 'कोपरगाव भूषण' पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. शेखर मुंदडा यांच्या मानपत्राचे वाचन सुनीताताई गिरमे यांनी केले, तर कैलास (बापू) वाणी यांच्या मानपत्राचे वाचन सुधीर डागा यांनी केले. पुरस्कार स्वीकारल्यानंतर दोन्ही सन्मानार्थींनी आपले मनोगत व्यक्त करताना कोपरगावशी असलेले ऋणानुबंध आणि आठवणींना उजाळा दिला. या सन्मानामुळे उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात आनंद व्यक्त केला.

कार्यक्रमात प्रमोद मुंदडा यांनी कोपरगावावर रचलेले खास गीत सादर केले. गावाविषयीचा जिव्हाळा आणि आठवणींचा भावनिक ठेवा या गीतातून व्यक्त झाला. यावेळी काका कोयटे यांच्या संकल्पनेतील असे होते कोपरगाव या पुस्तकाच्या तृतीय आवृत्ती प्रकाशनाचाही कार्यक्रम पार पडला. शेवटी कोपरगावच्या उज्ज्वल भविष्यासाठी सामूहिक संकल्प करण्यात आला. सुरेश गोरे व सौ.अद्विता उमराणीकर यांचे सुत्रसंचालन व आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

एकंदरीत, 'जावे आठवणींच्या गावा!' हा सोहळा केवळ जुन्या आठवणी सांगण्यापुरता मर्यादित न राहता कोपरगावच्या माणसांना, संस्कृतीला, परंपरेला आणि सामाजिक बांधिलकीला जोडणारा स्नेहमेळावा ठरला. गावापासून दूर गेलेल्या माणसांच्या मनातही आपल्या मातीविषयीचा अभिमान आणि आपुलकी किती घट्ट असते, याची सुंदर अनुभूती या कार्यक्रमातून आली.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी आयोजन कमिटीचे नंदकिशोर अग्रवाल, विवेक रत्नपारखी, अभिजीत शहा, परेश लोहाडे, किशोर गिरमे, नारायण क्षीरसागर, संजय लोहाडे, प्रताप महाले, विनोद ठोळे, मच्छिंद्र टेके, राजेंद्र गिरमे, सुधीर डागा, सुशांत घोडके, आशुतोष पटवर्धन, महेश जोशी, अनंत बर्गे, समता परिवारातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

विसापूर धरणातून शेतीसाठी तातडीने पाणी सोडा

अन्यथा २५ नोव्हेंबरपासून बेलवंडी फाटा येथे बेमुदत रास्ता रोको!

● श्रीगोंदा । वीरभूमी–



यंदा अत्यल्प पावसामुळे विसापूर कालवा लाभक्षेत्रातील शेती संकटात सापडली असून, फळबागांसह उभ्या पिकांना पाण्याची तीव्र गरज निर्माण झाली आहे. अद्याप शेतीसाठी एकही आवर्तन मिळाले नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. त्यामुळे कुकडीच्या सध्या सुरू असलेल्या आवर्तनातून विसापूर धरणात पाणी सोडून विसापूर कालव्याद्वारे शेतीसाठी तातडीने आवर्तन सुरू करावे, अशी शेतकरी व सर्वपक्षीय मागणी करण्यात आली आहे. अन्यथा २५ नोव्हेंबरपासून बेलवंडी फाटा येथे नगर–दौंड महामार्गावर बेमुदत रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा शेतकरी व लोकप्रतिनिधींनी दिला आहे.

यासंदर्भात कुकडी पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता आणि श्रीगोंदा तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले आहे. पिंपळगाव पिसा, खरातवाडी, बेलवंडी, लोणी व्यंकनाथ, पिसोरा, चिंभळा आणि शिरसगाव बोडखा या गावांमधील शेती प्रामुख्याने फळबागांवर अवलंबून आहे. पावसाअभावी फळबागा अडचणीत आल्या असून, जनावरांच्या चाऱ्याचा तसेच पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न गंभीर बनला आहे.

सध्या कुकडीचे आवर्तन सुरू असल्याने त्यातून विसापूर धरणात पाणी घेऊन तातडीने विसापूर कालव्याला शेतीसाठी आवर्तन द्यावे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या पिकांचे आणि फळबागांचे नुकसान टाळण्यासाठी प्रशासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी भूमिका निवेदनकर्त्यांनी मांडली आहे.

या निवेदनावर माजी आमदार राहुल जगताप, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष अण्णासाहेब शेलार, माजी जिल्हा परिषद सदस्य अनिल वीर, अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक दत्तात्रय पानसरे, महाराष्ट्र बाजार समिती महासंघाचे सभापती बाळासाहेब नाहाटा, टिळक भोस यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

शेतकऱ्यांच्या पाणीप्रश्नावर प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय न घेतल्यास २५ नोव्हेंबर २०२६ रोजी बेलवंडी फाटा येथे नगर–दौंड महामार्गावर सर्व शेतकरी बांधवांच्या वतीने बेमुदत रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. या आंदोलनामुळे प्रशासनासमोर पाणीप्रश्न सोडविण्याचे आव्हान उभे राहिले आहे.

दुष्काळावर मात करीत समृद्ध गावांच्या निर्मितीसाठी अहिल्यानगरमध्ये सरपंचांचा महासंवाद!

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत २७ नोव्हेंबरला नाशिक विभागीय कार्यशाळा

● अहिल्यानगर । वीरभूमी–

ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास, ग्रामपंचायतींचे सक्षमीकरण आणि गावांना विकासाच्या शाश्वत मार्गावर नेण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास व पंचायतराज विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या ङ्मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान २०२५–२६फ अंतर्गत नाशिक विभागाची विभागस्तरीय कार्यशाळा, पुरस्कार वितरण सोहळा तसेच ङ्मदुष्काळावर मात आणि समृद्ध गावांचा संकल्पफ या विषयावरील सरपंच परिसंवादाचे आयोजन शुक्रवार, दि. २७ नोव्हेंबर २०२६ रोजी अहिल्यानगर येथे करण्यात आले आहे.

हा कार्यक्रम सकाळी १० वाजता द्वारका लॉन, नेप्ती चौक, बायपासजवळ, नगर–कल्याण रोड, अहिल्यानगर येथे होणार आहे. या कार्यक्रमाला विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे, राज्यमंत्री डॉ. योगेश कदम यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. तसेच नाशिक विभागातील सर्व खासदार, आमदार, ग्रामविकास विभागाचे सचिव, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, सरपंच आणि ग्रामपंचायत अधिकारी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या माध्यमातून गावपातळीवर विकासाची विविध कामे प्रभावीपणे राबविणाऱ्या ग्रामपंचायतींना प्रोत्साहन देण्यात येत आहे. या अभियानांतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या नाशिक विभागातील पुरस्कारप्राप्त ग्रामपंचायतींचा या सोहळ्यात सन्मान करण्यात येणार आहे. या पुरस्कारांमुळे ग्रामपंचायतींच्या विकासकामांना प्रोत्साहन मिळण्याबरोबरच इतर ग्रामपंचायतींनाही उत्कृष्ट कामगिरी करण्याची प्रेरणा मिळणार आहे.

अहिल्यानगरसह नाशिक विभागातील अनेक भागांना दुष्काळी परिस्थितीचा सामना करावा लागतो. या पार्श्वभूमीवर पाणीटंचाईवर कायमस्वरूपी उपाययोजना, जलसंधारण, पाण्याचे नियोजन, लोकसहभागातून जलव्यवस्थापन, नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन आणि गावांच्या आर्थिक समृद्धीसाठी आवश्यक उपाययोजना या विषयांवर सरपंच परिसंवादात विचारमंथन होणार आहे.

गावाच्या विकासात सरपंच आणि ग्रामपंचायतींची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, स्थानिक गरजा ओळखून विकासाचे नियोजन करणे, उपलब्ध शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे आणि ग्रामस्थांच्या सहभागातून विकासकामे पूर्ण करणे याबाबत या परिसंवादातून मार्गदर्शन मिळणार आहे. दुष्काळी परिस्थितीवर मात करून प्रत्येक गाव स्वयंपूर्ण, जलसमृद्ध आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी लोकप्रतिनिधी व ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांमध्ये सकारात्मक विचारांची देवाणघेवाण होणार आहे.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण विकासाला गती देणे, गावांमध्ये स्पर्धात्मक वातावरण निर्माण करणे आणि विकासाच्या विविध निकषांवर ग्रामपंचायतींची कामगिरी उंचावणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. या विभागस्तरीय कार्यशाळा, पुरस्कार वितरण सोहळा आणि सरपंच परिसंवादाच्या माध्यमातून नाशिक विभागातील ग्रामपंचायतींच्या विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास मुख्य कार्यकारी अधिकारी श्री आनंद भंडारी यांनी व्यक्त केला आहे. या कार्यक्रमास नाशिक विभागातील सर्व सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी आणि संबंधितांनी उपस्थित राहावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

ग्रामीण आरोग्य सेवा सक्षम करण्यासाठी शासनाकडून आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणार

आ. मोनिका राजळे । शेवगाव पंचायत समितीत रुग्ण कल्याण समिती आणि तंत्र-सल्लागार समितीची बैठक

● शेवगाव । वीरभूमी–



ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळावी, यासाठी ग्रामीण रुग्णालयांना आवश्यक सोयी–सुविधा शासनाच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, अशी ग्वाही आमदार मोनिका राजळे यांनी दिली. डॉक्टरांनी नोकरी म्हणून नव्हे, तर सेवाभावाने रुग्णसेवा करावी, असे आवाहनही त्यांनी केले.

ग्रामीण रुग्णालय बोधेगाव व ग्रामीण रुग्णालय शेवगाव येथील रुग्ण कल्याण समिती आणि तंत्र–सल्लागार समितीची बैठक सोमवारी, शेवगाव पंचायत समिती सभागृहात पार पडली. या बैठकीत ग्रामीण भागातील आरोग्य सुविधांचा आढावा घेण्यात आला.

बैठकीस आमदार मोनिका राजळे, उपविभागीय अधिकारी प्रसाद मते, सोनाली म्हात्रे, तहसीलदार आकाश दहाडदे, गटविकास अधिकारी महेश दहिफळे, ग्रामीण रुग्णालय शेवगावच्या अधीक्षक डॉ. दर्शना धोंडे, ग्रामीण रुग्णालय बोधेगावचे अधीक्षक डॉ. श्रीकांत मोराळे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता प्रल्हाद पाठक, तसेच समितीचे अशासकीय सदस्य मंदाकिनी मुरकुटे, प्रसाद पवार, डॉ. गीता, निरज लांडे, गणेश रांधवणे, राहुल सावंत, सचिन वारकड, बाळासाहेब खरात, जयश्री खंडागळे, बापू धनवडे, अमोल माने, उषा कंगनकर आणि अनिल वडागळे आदी उपस्थित होते.

बैठकीचे प्रास्ताविक ग्रामीण रुग्णालय शेवगावच्या अधीक्षक डॉ. दर्शना धोंडे व ग्रामीण रुग्णालय बोधेगावचे अधीक्षक डॉ. श्रीकांत मोराळे यांनी केले. यावेळी त्यांनी दोन्ही ग्रामीण रुग्णालयांमार्फत रुग्णांना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या विविध सोयी–सुविधांची माहिती दिली. तसेच रुग्णालयांच्या आवश्यक कामांचा, प्रलंबित प्रश्नांचा आणि अतिरिक्त सुविधांच्या प्रस्तावांचा आढावा आमदार मोनिका राजळे यांच्यासमोर मांडण्यात आला.

यावेळी बोलताना आमदार मोनिका राजळे यांनी रुग्ण कल्याण समितीच्या माध्यमातून नागरिकांच्या आरोग्यविषयक समस्या सोडविण्यासाठी प्रभावी प्रयत्न करण्याचे आवाहन केले. डॉक्टरांनी रुग्णालयात अधिक वेळ देऊन रुग्णांना चांगली सेवा द्यावी. रुग्णसेवेत वेळेचे बंधन, शिस्त आणि सेवाभाव महत्त्वाचा असून, डॉक्टरांनी आपले कर्तव्य जबाबदारीने पार पाडावे, अशा सूचना त्यांनी केल्या.

बदलत्या जीवनशैलीमुळे आरोग्याच्या समस्या वाढत असून, तरुण वयातही हृदयविकाराचे प्रमाण वाढताना दिसत आहे. तसेच महिलांमध्ये कर्करोगाच्या वाढत्या प्रमाणाच्या पार्श्वभूमीवर प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत व्यापक जनजागृती करण्याची गरज आहे. हृदयविकार, कर्करोग यांसारख्या गंभीर आजारांचे वेळेत निदान व्हावे, यासाठी नियमित आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करावीत, अशा सूचना आमदार राजळे यांनी दिल्या.

ग्रामीण रुग्णालयांमधील अडचणी दूर करून आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाच्या माध्यमातून पाठपुरावा करण्यात येईल. ग्रामीण भागातील नागरिकांना अधिक चांगली, सुलभ आणि दर्जेदार आरोग्य सेवा मिळण्यासाठी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्यास प्राधान्य दिले जाईल, असे आश्वासन आमदार मोनिका राजळे यांनी बैठकीच्या शेवटी दिले.

ग्रामपंचायत कार्यालय कासार पिंपळगाव

ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर

जाहिरात

ग्रामरोजगार सेवक पदासाठी अर्ज मागविणेबाबत

ग्रामपंचायत कासार पिंपळगाव येथे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत (मनरेगा) ग्रामरोजगार सेवक पद रिक्त असल्याने सदर पदावर नवीन ग्रामरोजगार सेवकाची निवड करण्यात येणार आहे. त्यासाठी पात्र व इच्छुक उमेदवारांकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर पदाची निवड ग्रामसभेद्वारे करण्यात येणार असून, शासन निर्णय क्र. मग्रारोहयो–२०११/प्र.क्र.४०/रोहयो–१०, मंत्रालय, मुंबई–४०००३२, दिनांक २ मे २०११ मधील तरतुदी व मार्गदर्शक सूचनांनुसार पात्रता, शैक्षणिक अर्हता, कर्तव्ये व जबाबदाऱ्या विचारात घेऊन निवड प्रक्रिया राबविण्यात येईल. निवड करण्याचा अंतिम अधिकार ग्रामसभेस राहील.

१. शैक्षणिक पात्रता व आवश्यक अटी : १. उमेदवार किमान दहावी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. बारावी उत्तीर्ण उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. २. उमेदवाराने दहावी व बारावीचे गुणपत्रक अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. ३. उमेदवार ग्रामपंचायत कासार पिंपळगाव हद्दीतील स्थानिक रहिवासी असावा. ४. संगणकाचे ज्ञान असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. नियुक्तीनंतर सहा महिन्यांच्या आत MS-CIT किंवा तत्सम संगणक परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. ५. आधार कार्ड, रहिवासी पुरावा व शैक्षणिक प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती अर्जासोबत जोडाव्यात. ६. निवड शासनाच्या प्रचलित नियम व मार्गदर्शक सूचनांनुसार करण्यात येईल. ७. भविष्यात कामाच्या संदर्भात शासन किंवा सक्षम प्राधिकरणामार्फत घेण्यात येणाऱ्या चाचण्या अथवा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. सदर चाचणी किंवा परीक्षेत अपयशी ठरल्यास शासनाच्या नियमानुसार सेवेतून कमी करण्याची कार्यवाही करण्यात येऊ शकते. ८. विकसित भारत – अजीविका मिशन (VB-GRAMG)/मग्रारोहयो शासन निर्णयानुसार सदर पदासाठी मासिक मानधन रुपये ८,०००/– देण्याची तरतूद आहे.

२. अर्ज स्वीकारण्याचा कालावधी : दिनांक २४/११/२०२६ ते ३०/११/२०२६
अर्ज स्वीकारण्याची अंतिम वेळ : दिनांक ३०/११/२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजेपर्यंत.

३. अर्ज स्वीकारण्याचे ठिकाण : ग्रामपंचायत कार्यालय, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर.

४. विशेष सूचना : १. अपूर्ण अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.
२. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.
३. अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे जोडणे बंधनकारक राहील.
४. निवड प्रक्रिया ग्रामसभेद्वारे पार पाडण्यात येईल.
५. निवड प्रक्रियेबाबत ग्रामसभा व सक्षम प्राधिकाऱ्याचा निर्णय अंतिम राहील.

दिनांक : २४/११/२०२६

ग्रामपंचायत अधिकारी । सरपंच/प्रशासक
ग्रामपंचायत कासार पिंपळगाव । ग्रामपंचायत कासार पिंपळगाव

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर–४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.
* संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

पुढील आवर्तने केवळ पिण्याच्या पाण्यासाठीच, पाणी जपून वापरा

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील । मागील टंचाई आढावा बैठकीतील सुचनांवर केलेल्या कार्यवाहीबाबत आढावा बैठक

● राहाता । वीरभूमी –

धरणांमध्ये उपलब्ध असलेल्या पाणीसाठ्यातून आवर्तनाचा लाभ देण्याचा प्रयत्न करण्यात आला असला, तरी आगामी काळ अधिक आव्हानात्मक असणार आहे. पुढील आवर्तने झालीच, तर ती केवळ पिण्याच्या पाण्यासाठी असतील. त्यामुळे पाण्याबरोबरच खर्चाचीही बचत करावी. चारा उत्पादनाचे नियोजन करण्यासाठी कृषी सहाय्यक आणि पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी समन्वयातून गावनिहाय सर्व्हेक्षण करण्याच्या सूचना जलसंपदा तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या. टंचाई परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या अडचणी सोडविण्यासाठी यापुढील आढावा बैठका विभागनिहाय घेण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

मागील महिन्यात टंचाई आढावा बैठकीत करण्यात आलेल्या सूचनांवर प्रशासनाने केलेली कार्यवाही आणि अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी मंत्री विखे पाटील यांच्या उपस्थितीत बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला अतिरिक्त जिल्हाधिकारी तुकाराम हुलहुळे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता बाळासाहेब शेटे, प्रांताधिकारी माणिक आहेर, तहसीलदार अमोल मोरे, कृषी अधिकारी आबासाहेब भोरे, ज्ञानेश्वर गोंदकर, नगराध्यक्षा जयश्री थोरात, उपनगराध्यक्ष अभय शेळके यांच्यासह शेतकरी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

मंत्री विखे पाटील यांनी टंचाई आढावा बैठकीच्या निमित्ताने तालुक्यातील गावनिहाय पाणीस्थिती, चारा टंचाई आणि पाणीपुरवठा योजनांच्या समस्यांची माहिती घेतली. गावातील समस्यांबाबत कार्यकर्त्यांनी केलेल्या सूचना व मागण्यांची दखल घेऊन संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

पाणीपुरवठा योजनांच्या समस्या अद्यापही सुटत नसल्याबद्दल त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. साकुरी गावाच्या पाणीपुरवठा योजनेचे ८० टक्के काम पूर्ण झाले असतानाही उर्वरित काम रखडल्यामुळे ग्रामस्थांना पाणी मिळत नसल्याची बाब बैठकीत निदर्शनास आणून देण्यात आली. गोदावरी आणि निळवंडे धरणातून सोडलेल्या आवर्तनामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाल्याबद्दल बैठकीत मंत्री विखे पाटील यांचे विशेष अभिनंदन करण्यात आले. मात्र, उपलब्ध पाणीसाठ्याच्या परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेण्याचे आवाहन त्यांनी उपस्थित शेतकरी व अधिकाऱ्यांना केले.

धरणात पाणी उपलब्ध होते म्हणून आवर्तन देता आले. मात्र, आगामी काळ अत्यंत आव्हानात्मक असून, पुढील आवर्तने झालीच तर ती केवळ पिण्याच्या पाण्यासाठी असतील. त्यामुळे पाण्याचा अपव्यय टाळावा, अशा सूचना त्यांनी दिल्या. मुळा आणि कुकडीचे आवर्तन सुरू असताना कोणत्याही ठिकाणी अनधिकृत पाणी उपसा होऊ देऊ नये. आवर्तनाच्या काळात जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी याबाबत गांभीर्याने लक्ष ठेवावे, असे निर्देश त्यांनी दिले. यावेळी वाकडी, चितळी, आडगाव आदी गावांतील ग्रामस्थांनीही विविध समस्या व सूचना मांडल्या.

विवाह सोहळ्यांतील खर्च कमी करण्याचे आवाहन

■ पाण्याबरोबरच खर्चावरही नियंत्रण आणण्याची गरज आहे. विवाह सोहळ्यांमधील अनावश्यक खर्च कमी करून समारंभ ५० लोकांच्या उपस्थितीत साधेपणाने करावेत. राहाता तालुक्याने याची सुरुवात करून राज्यासमोर आदर्श निर्माण करावा, असे आवाहन मंत्री विखे पाटील यांनी बैठकीत पुन्हा एकदा केले.

दुष्काळी परिस्थितीत ग्रामीण भागासाठी पशुधन हा महत्त्वाचा आधार ठरणार असल्याने पशुधन वाचविण्यासाठी प्रशासनाने संवेदनशीलतेने काम करावे, असे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले. गावपातळीवर पशुधन, पशुपालक आणि चारा उत्पादनासाठी इच्छुक शेतकऱ्यांची माहिती अद्याप संकलित झाली नसल्याबद्दल त्यांनी पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांवर नाराजी व्यक्त केली.



प्रत्येक गावात कृषी सहाय्यक आणि पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी एकत्रितपणे सर्व्हेक्षण करून चारा उत्पादनाचे नियोजन करावे. उपलब्ध पाण्यातून रब्बी पिकांना आधार मिळेल, त्याचबरोबर चारा उत्पादनासाठीही आवर्तनाचा लाभ करून घेण्याचे नियोजन करावे, अशा सूचना त्यांनी दिल्या.

महायुती सरकारने जाहीर केलेल्या कर्जमाफी योजनेअंतर्गत ५० हजार रुपयांचे अनुदान मंजूर झालेल्या शेतकऱ्यांच्या याद्या प्राप्त झाल्या आहेत. मात्र, बँकांकडून अधिक व्याज आकारले जात असल्याच्या तक्रारी बैठकीत करण्यात आल्या. या संदर्भात तालुका विकास अधिकाऱ्यांनी बुधवारी विशेष बैठक घेऊन शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन करावे, असे निर्देश मंत्री विखे पाटील यांनी दिले.

वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी बुधवारी कार्यालयात उपस्थित राहून गावनिहाय वीज समस्यांचे निराकरण करावे, अशा सूचनाही त्यांनी केल्या.

नव्याने प्राप्त झालेल्या सूचनांच्या अंमलबजावणीसाठी प्रत्येक विभागाने प्राधान्यक्रम निश्चित करावा. दर महिन्याला कार्यवाहीचा आढावा घेतला जाणार असून, यापुढील बैठका विभागनिहाय आयोजित करण्यात येतील. टंचाईच्या परिस्थितीत नागरिकांना आधार देण्याचे महायुती सरकारचे धोरण आहे. इतर खर्चांना फाटा देऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली दुष्काळी परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी शासन आणि प्रशासन काम करीत असल्याचे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले.

लाडजळगाव, बाडगव्हाण, आधोडी, दिवटे व मुरमीचा पाणीपुरवठा तातडीने सुरू करा

ग्रामपंचायतीची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

● शेवगाव । वीरभूमी–



शेवगाव तालुक्यातील लाडजळगाव, बाडगव्हाण, आधोडी, दिवटे व मुरमी या गावांतील पाणीटंचाईचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण योजनेंतर्गत पूर्ण झालेली पाणीपुरवठा योजना तातडीने कार्यान्वित करावी, अशी मागणी लाडजळगाव गट ग्रामपंचायतीच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे. सध्याच्या दुष्काळजन्य परिस्थितीत या योजनेद्वारे गावांना पाणीपुरवठा सुरू झाल्यास ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळणार आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण योजनेंतर्गत आधोडी येथील योजनेचे काम पूर्ण झाले आहे. या योजनेतील पाण्याच्या टाकीचे बांधकामही पूर्ण झाले असून, त्याअंतर्गत येणाऱ्या लाडजळगाव, बाडगव्हाण व मुरमी या गावांतील पाण्याच्या टाक्यांची कामेही पूर्ण झाली आहेत. तसेच योजनेचे पाणी सोडून त्याची टेस्टिंगदेखील करण्यात आली आहे. असे असतांना ही अद्याप प्रत्यक्ष पाणीपुरवठा सुरू झालेला नसल्याने ग्रामस्थांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. सध्या परिसरात दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली असून पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत सर्व कामे पूर्ण झालेली असतांना केवळ योजना कार्यान्वित होण्याच्या प्रतीक्षेत राहणे योग्य नाही. प्रशासनाने तातडीने या योजनेतील अडचणी दूर करून तीनही गावांचा पाणीपुरवठा सुरू करावा. त्यामुळे नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी होणारी भटकंती थांबण्यास मदत होईल, तसेच दुष्काळी परिस्थितीचा सामना करणेही सुलभ होईल, असे निवेदनात म्हटले आहे.

यासंदर्भात लाडजळगाव गट ग्रामपंचायतीचे सरपंच अंबादास बाबासाहेब ढाकणे यांनी जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांना निवेदन देऊन योजना तातडीने सुरू करण्याची मागणी केली आहे.

या निवेदनाच्या प्रती पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, पाणीपुरवठामंत्री गुलाबराव पाटील, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, शेवगाव–पाथर्डीच्या आमदार मोनिका राजळे, उपविभागीय अधिकारी पाथर्डी, तहसीलदार शेवगाव व गटविकास अधिकारी पंचायत समिती शेवगाव यांना पाठविण्यात आल्या आहेत.

योजनेची कामे पूर्ण होऊनही पाणीपुरवठा सुरू नसल्याने आता प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन लाडजळगाव, बाडगव्हाण, आधोडी, दिवटे व मुरमी या गावांचा पाणीप्रश्न तातडीने सोडवावा, अशी अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.

तुकाई उपसा सिंचन योजनेतून कर्जतच्या १९ गावांतील ५९९ हेक्टर शेतीला मिळणार शाश्वत सिंचनाचा आधार!

विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे । तुकाई उपसा सिंचन योजनेच्या पंपगृह कामाचे उद्घाटन

● कर्जत । वीरभूमी–

शेतकऱ्यांना शेतीसाठी हक्काचे आणि शाश्वत पाणी उपलब्ध करून देणे, पावसाच्या अनिश्चिततेमुळे होणारे पीकनुकसान कमी करणे आणि ग्रामीण भागातील शेती अर्थव्यवस्थेला बळकटी देणे, यासाठी राज्य शासन विविध सिंचन व जलसंधारण प्रकल्पांना प्राधान्य देत आहे. याच प्रयत्नांचा महत्त्वपूर्ण भाग असलेल्या तुकाई उपसा सिंचन योजनेमुळे कर्जत तालुक्यातील १९ गावांमधील सुमारे ५९९ हेक्टर शेतीला सिंचनाची सुविधा उपलब्ध होणार आहे. या योजनेअंतर्गत २७ तलावांमध्ये पाणी उपलब्ध होणार असून, सौरऊर्जेवर आधारित यंत्रणेमुळे शेतकऱ्यांना वीजबिलाचा भारही सहन करावा लागणार नाही. त्यामुळे तुकाई उपसा सिंचन योजना कर्जतच्या दुष्काळी भागासाठी वरदान ठरणार असल्याचे प्रतिपादन विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी केले.

कर्जत तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीवर मात करून शेतीला शाश्वत पाण्याचा आधार निर्माण करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या तुकाई उपसा सिंचन योजनेच्या पंपगृह कामाचा उद्घाटन सोहळा आज मौजे शिंदे येथे उत्साहात संपन्न झाला. महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे आणि मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. यावेळी मृद व जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर, मुख्य अभियंता हरिभाऊ गीते, कार्यकारी अभियंता पांडुरंग गायसमुद्रे तसेच परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रकल्पाच्या पंपगृहासाठी जमीन उपलब्ध करून देणाऱ्या शिंदे गावातील ताराबाई घालमे, सदाशिव घालमे आणि मोहन घालमे यांचा प्रातिनिधिक स्वरूपात सत्कार करण्यात आला.



सभापती प्रा. राम शिंदे म्हणाले की, शेतीचे उत्पादन वाढविणे, पीक नुकसानीची जोखीम कमी करणे आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे या दृष्टीने तुकाई उपसा सिंचन योजना अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे. मृद व जलसंधारण विभागाची ही पहिली उपसा सिंचन योजना असून, यासाठी ६६ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. या योजनेच्या माध्यमातून २७ तलाव भरले जाणार असून, सुमारे ५९९ हेक्टर शेतीला सिंचनाचा लाभ मिळणार आहे.

या योजनेतील पाण्याचे व्यवस्थापन पाणी वापर संस्थेमार्फत करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, योजनेसाठी सौरऊर्जे द्वारे विजेची उपलब्धता करण्यात आली असल्याने वीजबिलाचा अतिरिक्त आर्थिक भार शेतकऱ्यांवर पडणार नाही. पाण्याची उपलब्धता वाढल्यामुळे शेतकऱ्यांना पिकांचे नियोजन करणे शक्य होईल. पारंपरिक शेतीसोबतच फळबाग लागवड आणि अधिक उत्पन्न देणाऱ्या पिकांकडे वळण्याची संधी निर्माण होईल. यामुळे शेती अधिक फायदेशीर होऊन शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीत सकारात्मक बदल घडण्यास मदत होणार आहे.

परिसरातील पाझर तलावांच्या बळकटीकरणासाठीही विशेष प्रयत्न करण्यात येणार असून, त्याबाबतचा प्रस्ताव पंधरा दिवसांत तयार करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत. सिंचनाच्या पायाभूत सुविधा निर्माण करण्यासोबतच उपलब्ध पाण्याचे संवर्धन आणि योग्य व्यवस्थापन करण्यावरही भर देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड म्हणाले की, राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी जलसंधारणाची कामे लोकसहभागातून व्यापक लोकचळवळ म्हणून उभी राहणे आवश्यक आहे. जलयुक्त शिवार ३.० ही योजना लवकरच कार्यान्वित करण्यात येणार असून, या माध्यमातून राज्यातील १८ हजार गावांमध्ये जलसंधारणाची विविध कामे करून ही गावे जलसमृद्ध करण्याचे उद्दिष्ट आहे. या कामांसाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नसल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे.

शेतजमिनीची सुपीकता वाढविण्यासाठी 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शेती' ही योजना महत्त्वपूर्ण ठरत आहे. या योजनेअंतर्गत धरणांमधील गाळ काढण्यासाठी शासनाकडून निधी उपलब्ध करून दिला जात आहे. त्यामुळे जलसाठ्यांची क्षमता वाढण्यासोबतच गाळाचा वापर शेतीची सुपीकता वाढविण्यासाठी होणार आहे. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेची कामे राज्यातील १ हजार ५२० गावांमध्ये सुरू आहेत. याशिवाय जलतारा प्रकल्प, नाला रुंदीकरण व खोलीकरण, बंधाऱ्यांची दुरुस्ती आणि रेन वॉटर हार्वेस्टिंग यांसारख्या विविध उपक्रमांच्या माध्यमातून पावसाचे पाणी अडविणे, जिरविणे आणि त्याचा शेतीसाठी उपयोग करणे यावर भर दिला जात आहे.

तुकाई उपसा सिंचन योजना ही केवळ पाणी उपलब्ध करून देणारी योजना नसून कर्जत तालुक्यातील दुष्काळी भागाच्या कृषी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी दिशा देणारा महत्त्वपूर्ण प्रकल्प आहे. या प्रकल्पासाठी सभापती प्रा. राम शिंदे यांचा पाठपुरावा महत्वाचा ठरला आहे. सिंचनासाठी पाणी उपलब्ध झाल्याने शेतकऱ्यांना पीकपद्धतीत बदल करता येईल, फळबाग लागवडीला चालना मिळेल आणि शेतीचे उत्पादन व उत्पन्न वाढण्यास मदत होईल. शासनाच्या विविध जलसंधारण आणि सिंचन योजनांचा लाभ शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न असल्याचेही मंत्री राठोड यांनी सांगितले.

ऐतिहासिक वारशांच्या संवर्धनासाठी समाजात जागृती आवश्यक

लेखिका काजल जंजिरे । धर्मवीर गडावरील माहितीपूर्ण पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन

● अहिल्यानगर । वीरभूमी–

इतिहासाचे जतन म्हणजे केवळ जुन्या वास्तूंचे संरक्षण नव्हे, तर त्यांच्याशी निगडित सत्य, स्मृती आणि सांस्कृतिक संदर्भांचे संवर्धन करणे होय. ऐतिहासिक वारसा जतन करण्यासाठी समाजात जागरूकता निर्माण होणे अत्यंत गरजेचे आहे, असे प्रतिपादन लेखिका व प्रसिद्ध वास्तुविशारद काजल महेश जंजिरे यांनी केले.

छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्याची साक्ष देणाऱ्या अहिल्यानगर जिल्ह्यातील पेडगाव (ता. श्रीगोंदा) येथील धर्मवीर गडाची सविस्तर ऐतिहासिक माहिती देणारे पुस्तक लेखिका काजल जंजिरे यांनी शब्दबद्ध केले आहे. या माहितीपूर्ण पुस्तकाचा प्रकाशन सोहळा आमदार विक्रमसिंह पाचपुते आणि आमदार हेमंत ओगले यांच्या हस्ते धर्मवीर गड परिसरात विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीत नुकताच पार पडला. यावेळी त्या बोलत होत्या.

आमदार विक्रमसिंह पाचपुते यांच्या काष्टी गावची कन्या आणि आमदार हेमंत ओगले यांच्या पेडगाव गावच्या स्नुषा असलेल्या काजल जंजिरे यांनी पुस्तकनिर्मितीचा प्रवास उपस्थितांसमोर उलगडला. छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्याचे विविध पैलू आणि धर्मवीर गडाचा ऐतिहासिक वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी हे पुस्तक प्रभावी माध्यम ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

केंद्रीय राखीव पोलीस दलात सहाय्यक कमांडंट पदावर कार्यरत असलेले पती महेश ईश्वर जंजिरे यांचा भक्कम पाठिंबा, प्रोत्साहन आणि विशेष योगदान यामुळे पुस्तकनिर्मितीचा प्रवास सुकर झाला. तसेच सासू–सासरे आणि आई–वडिलांच्या आशीर्वादामुळे हे कार्य पूर्णत्वास नेणे शक्य झाल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले.

आमदार विक्रमसिंह पाचपुते आणि आमदार हेमंत ओगले यांनी लेखिका काजल जंजिरे यांचे विशेष कौतुक केले. राज्यातील विधानसभा आणि विधान परिषदेच्या सर्व आमदारांपर्यंत या पुस्तकाच्या माध्यमातून छत्रपती संभाजी महाराजांचे शौर्य तसेच पेडगावच्या धर्मवीर गडाचा इतिहास व महत्त्व पोहोचविणार असल्याचे आमदार हेमंत ओगले यांनी सांगितले.

आमदार विक्रमसिंह पाचपुते यांनी काष्टी गावची लेक असलेल्या काजल जंजिरे या सिद्धहस्त लेखिका, चाणाक्ष संशोधक आणि उत्कृष्ट वास्तुविशारद असल्याचा अभिमान असल्याचे नमूद केले. त्यांच्या या वक्तव्याला उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली. धर्मवीर गडाच्या संवर्धन आणि सुशोभीकरणासाठी भरीव निधी उपलब्ध करून देण्यासाठी आपण पुढाकार घेतला असल्याचेही पाचपुते यांनी सांगितले.

यावेळी ज्येष्ठ नेते ॲड. डी. डी. घोरपडे, इतिहासकार प्रा. डॉ. नवनाथ वाव्हळ, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे विभागीय अध्यक्ष जयंत येलूलकर, कवी चंद्रकांत पालवे, नेत्रदूत जालिंदर बोरुडे, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष अरविंद कापसे, निवृत्त आयपीएस अधिकारी हेमंतराजे गायकवाड आणि पेडगावचे सरपंच इरफानभाई पिरजादे आदी मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले.

गणराज प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या या पुस्तकाला वरिष्ठ पत्रकार व मुंबई उच्च न्यायालयातील वकील डॉ. बाळासाहेब बोठे पाटील यांची प्रस्तावना लाभली आहे. पुस्तकनिर्मितीसाठी 'गणराज'चे संचालक प्रा. गणेश भगत, 'क्रिएटिव्ह कम्युनिकेशन्स'चे संचालक व ज्येष्ठ पत्रकार जयंत देशपांडे आणि गणेश मुद्रणालयाचे संचालक गणेश दळवी यांचे वेळोवेळी सहकार्य मिळाल्याचे लेखिका काजल जंजिरे यांनी सांगितले.

ॲड. डॉ. बाळासाहेब बोठेपाटील यांनी प्रास्ताविक केले. लेखिका काजल जंजिरे यांचे सासरे ईश्वर जंजिरे, सासू सुनीता जंजिरे, वडील सुनील दरेकर, आई अश्विनी दरेकर, सामाजिक कार्यकर्ते सुरेश जंजिरे आणि युवा नेते महेश दरेकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले.



पत्रकार विशाल चव्हाण यांनी आपल्या खास खुमासदार शैलीत कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. गणेश भगत यांनी आभार मानले. या सोहळ्याला राज्यातील विविध क्षेत्रांतील मान्यवर तसेच महेश जंजिरे यांचे विविध विभागांमध्ये कार्यरत असलेले राज्यभरातील अधिकारी मित्र मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमानंतर उपस्थितांनी धर्मवीर गडाच्या सुमारे ९० एकर परिसरातील ऐतिहासिक वास्तू, मंदिरे आणि अन्य वारशांची पाहणी केली. या ऐतिहासिक स्थळाचा समृद्ध इतिहास जाणून घेण्याची संधीही यावेळी उपस्थितांना मिळाली.